# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

C/O महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत

(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४

दूरध्वनी क्र. :- 020-29709617, 29709396 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscepune@gmail.com


**दरपत्रक सूचना**

जा.क्र.मरापप/भांडार/Inte.Audit/2025/ 2381

दिनांक :- 08 /05/2025

प्रति,

-----------------------

-----------------------

-----------------------

**विषय :- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे सन 2025-2026 व सन 2026-2027 वित्तीय वर्षाकरिता अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजाकरिता सनदी लेखापालाची नियुक्ती करणेसाठीचे दरपत्रक.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील वसूल केलेले आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता व लेखाविषयक अंतर्गत लेखापरिक्षणाचे सन 2025-2026 व 2026-2027 या वित्तीय कालावधीचे कामकाज करणेकरिता सनदी लेखापालाची नियुक्तीसाठी सिलबंद पाकिटात दरपत्रक मागविण्यात येत आहे.

दरपत्रक स्विकृत दि.15/05/2025 रोजी सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (राज्यमंडळ) भांबुर्डा, शिवाजीनगर, आघारकर इन्स्टिटयुट मागे, आगरकर रोड, पुणे - 04 येथे **(दुसरा मजला, आवक-जावक शाखेत)** कार्यालयात हस्तपोच / सादर करण्यात यावी / देण्यात यावी. यानंतर परिषदेस प्राप्त झालेली दपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. याची नोंद घेण्यात यावी.

1. दरपत्रक सिलबंद पाकिटात असाव्यात व पाकिटावर दरपत्रक लिहावे व ज्या पत्र क्रमांकानुसार बोलविण्यात आलेले आहे त्या पत्राचा क्रमांक व दिनांक नमूद करावा.
2. दरपत्रक स्विकृतीची वेळ सकाळी 09.45 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत असून, प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 19/05/2025 रोजी चौथ्या मजल्यावरील आयुक्त दालनात उघडण्यात येईल. त्यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहू शकतो. काही प्रशासकीय वा कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य नाही तर लगतच्या नंतरच्या दिनांकास वा परिषदेच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.
3. दरपत्रकात सेवेसाठीचा दर वस्तू व सेवा करासहित (GST) समाविष्ट करण्यात यावा.
4. सेवा पुरवठादाराकडे अधिकृत परवाना असणे आवश्यक आहे.
5. दरपत्रकामधील सेवा सर्व साधारणपणे ज्यांना सेवा देण्याबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यांनी वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक व इन्कम टॅक्स क्लियरन्स सादर करणे अपेक्षित आहे.
6. परिषदेतील वसूल केलेले आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता सनदी लेखापालाची नियुक्ती कार्यादेश आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षापर्यंत असेल. या कालावधीत आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता व लेखाविषयक अंतर्गत लेखापरिक्षणाचे उदभवणाऱ्या त्रुटी व इतर खोळंबा याची संपूर्ण निराकरण करणे बंधनकारक राहतील.
7. परिषदेतील सनदी लेखापालाच्या सेवा देण्याबाबतचे देयक तीन प्रतीत व त्रैमासिक या कार्यालयास सादर करावे. तसेच प्रत्येक 3 महिन्यानंतर देण्यात आलेल्या सेवेची खात्री व त्याची तपासणी झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.

8. सनदी लेखापालाची सेवा समाधानकारक नसल्यास देण्यात येणारी सेवा नाकारण्यात येईल, याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील.

9. कोणतीही गोंधळात राहणारी किंवा वेगवेगळे अर्थ न निघणारी बाब दरपत्रकात राहणार नाही. याची काळजी घ्यावी.

10. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

11. **लखोटा क्र.1** मध्ये सर्व तांत्रिक कागदपत्रे जोडून सिलबंद करण्यात यावा व त्यावर तांत्रिक कागदपत्रे बाबतचा लखोटा असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

12. **लखोटा क्र.2** मध्ये वित्तीय दर सर्व करासहित नमूद करुन लखोटा सिलबंद करण्यात यावा व त्यावर दराचा लखोटा असे स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

13. लखोटा क्र.1 मधील दर्शविलेली प्रमाणपत्रे अपूर्ण असल्यास लखोटा क्र.2 वित्तीय उघडण्यात येणार नाहीत.

14. मंजूर होणाऱ्या संस्थेसोबत रुपये 500/- रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येईल.

15. संस्थेकडून अटी नमूद करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. परिषदेकडून याबाबत सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत वा त्याकडून पत्रव्यवहार करण्यास परिषद बांधील राहणार नाही.

16. दरपत्रक धारकांनी खोटी व बनावट कागदपत्रे सादर केल्याचे तपासणी अंती आढळून आल्यास अशा दरपत्रक धारकांवर आवश्यकतेप्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत निर्णय घेण्यात येईल.

17. दिलेल्या मुदतीत आपली दरपत्रके या कार्यालयास प्राप्त न झाल्यास वरील सर्व संपूर्ण अटी मान्य नाहीत असे समजण्यात येईल.

18. परिषदेतील वसूल केलेले आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता व लेखाविषयक अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजाकरिता सनदी लेखापालाची नियुक्ती दोन वर्ष कालावधीसाठी करताना आवश्यक कामाचे स्वरुप सोबतच्या प्रपत्रात नमूद केले आहे, त्यानुसार दरपत्रक सादर करावे.

19. सदर दरपत्रक परिषदेच्या संकेतस्थळांवर **www.mscepune.in** उपलब्ध आहे.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

**प्रपत्र - अ ब लखोटा क्र.1 (तांत्रिक कागदपत्रे) अर्जासोबत जोडवायचे आवश्यक कागदपत्रांची सूची**

| अ.क्र. | तपशिल | माहिती भरणे |
|---|---|---|
| 1. | सेवा देणाऱ्या संस्थेचे नांव | |
| 2. | संस्थेचा नोंदणी क्रमांक | |
| 3. | सेवा पुरवठादार / संचालकांचे नांव, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल | |
| | **तांत्रिक कागदपत्रे जोडणे सूची** | |
| 4. | ICAI कडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र | |
| 5. | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र | |
| 6. | पॅन कार्ड प्रत | |
| 7. | आधार कार्ड प्रत | |
| 8. | ITR Assessment Year 2024-2025, 2025-2026 | |
| 9. | अटी, नियम मान्य असल्याबाबतचे संमती प्रमाणपत्र | |
| 10. | अनुभवाचा तपशिल | |
| 11. | स्थापनेपासून आजतागायत संस्था काळ्या यादीत नसल्याचे स्वत: चे लेटरहेडवर प्रमाणपत्र | |
| 12. | इतर माहिती (आवश्यक प्रमाणपत्राच्या झेरॉक्स) | |

**(सुचना- दरपत्रकामधील अ.क्र. 1 ते 3 मधील माहिती भरुण, त्या पृष्ठर्थ प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.)**

मी / आम्ही खालील सही करणार असे शपथपूर्वक प्रमाणित करतो की, वरील नमुद केलेली माहिती खरी असून मला / आम्हाला सर्व अटी मान्य आहेत.

स्थळ:- सही:-

दिनांक:- नाव:-

शिक्का:-

प्रपत्र - ब लखोटा क्र.2 (वित्तीय दर) -

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर एकत्रित / सर्व करांसहित (रुपये) FY 2025 - 2026 | दर एकत्रित / सर्व करांसहित (रुपये) FY 2026-2027 |
|---|---|---|---|
| 1. | पहिला त्रैमासिक अहवाल सन 2025-2026 व 2026-2027 | | |
| 2. | दुसरा त्रैमासिक अहवाल सन 2025-2026 व 2026-2027 | | |
| 3. | तिसरा त्रैमासिक अहवाल सन 2025-2026 व 2026-2027 | | |
| 4. | अंतर्गत वार्षिक अहवाल सन 2025-2026 व 2026-2027 | | |
| 5. | अंतर्गत लेखा परीक्षणाकरिता लेखा विषयक लेखा संहिता व म.ना.से. नियमास अधिन राहून कामकाज करावे. | | |
| 6. | अंतर्गत लेखापाल यांनी सदर कामाचे फी मध्ये सर्व करांचा समावेश करावा. | | |
| 7. | लेखांकनामध्ये घेतलेल्या जमा व बँक खात्यावरील प्रत्यक्ष जमा लेखांकनासह ताळमेळ घ्यावा. | | |
| 8. | परिषदेचे लेखा विषयक सल्लागार म्हणून कामकाज पहावे लागेल. | | |
| 9. | लेजर, रिसिट पेमेंट, इन्कम आणि एक्सपेंडिचर, बॅलेन्स शीट चे अंतर्गत लेखा परिक्षण करावे. आर्थिक वित्तीय प्रपत्रे तयार करणे. | | |
| 10. | लेखापरिक्षणात घेतलेल्या त्रुटींचे निराकरण करणेबाबत मार्गदर्शन करावे. | | |
| 11. | लेखा विषयक असलेल्या अडी अडचणीबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे. | | |
| 12. | GSTR-7 मासिक विवरणपत्र (आकस्मिक खर्चातून GST/TDS) आयकर कार्यालयास सादर करणे. | | |
| 13. | परिषदेतील अधिकारी/कर्मचारी यांचे आयकर संदर्भात फॉर्म नं.16, 24 Q चा त्रैमासिक अहवाल (वर्षात चार अहवाल) याबाबतचे आयकर संदर्भात संपूर्ण कामकाज करावे व 26 Q चा त्रैमासिक आयकर आणि आकस्मिक खर्च देयकाबाबत E-TDS विवरणपत्र संदर्भात संपूर्ण कामकाज करावे. | | |
| 14. | कार्यालयातील जुन्या कार्यालयीन प्रकरणातील E-TDS सुधारित करुन आयकर कार्यालयास सादर करणे. | | |
| 15. | GSTR-7 ठेकेदारांना देणे. | | |
| 16. | E-TCS त्रैमासिक विवरणपत्र आयकर कार्यालयास सादर करणे. | | |
| 17. | आयकर अधिनियम 1961 मधील तरतूदीनुसार परिषदेला आयकर सुट मिळणेबाबत कार्यवाही करणे. | | |
| 18. | वस्तूव सेवा कर परिषदेच्या जमा व खर्चाचे लेखांकन करणे व त्यांचे ताळमेळ घेणे. | | |
| | एकूण अ.क्र. **1 ते** 18 मध्ये नमूद केलेल्या कामाबाबत एकत्रित रक्कम रुपये | | |

**सेवा पुरवठादाराने दरपत्रक सादर करतांना अटी, नियम मान्य असल्याबाबतचे संमती प्रमाणपत्र**

मी / आम्ही दरपत्रकातील व दरपत्रकासोबत जोडलेल्या अटी व शर्तींचे काळजीपुर्वक वाचन केले असून त्या सर्व समजून घेतल्या आहेत व त्यानुसार दरपत्रक, प्रपत्र अ व ब सोबत परिपुर्ण भरून दिलेले आहेत. तसेच मी / आम्ही या अटी व शर्तीनुसार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे करिता आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता व लेखाविषयक अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजाकरिता सनदी लेखापालाची सेवा योग्यरित्या पुरवठा करण्यास बांधील राहु. सदर सेवा यामध्ये कोणत्याही प्रकारची हयगय व विलंब होणार नाही याची दक्षता घेवू. सदर सेवा योग्यरित्या कार्यरत ठेवण्याची संपुर्ण जबाबदारी आमची राहील.

दिनांक

स्थळ

सेवा पुरवठादारचे नाव, स्वाक्षरी व शिक्का